# शासकीय छायचित्रण नोंदणी कार्यालयातील कामकाज

## (FUNCTIONS IN GOVERNMENT PHOTO REGISTRY OFFICE)

नोंदणी अधिनियमातील तरतुदीनुसार, नोंदणी झालेल्या दस्तांची प्रतिलिपी (कॉपी) दुय्यम निबंधक कार्यालयातील संबधित नोंदणी पुस्तकामध्ये ठेवून, जतन करावी लागते. प्रतिलिपी (कॉपी) करण्यासाठी सुरुवातीला हस्तलेखनाची पध्दत होती. तदनंतर सन 1930 पासून, छायाचित्रण (Photography) पध्दत सुरु झाली.

या पध्दतीमध्ये, दस्तांची नोंदणी झाल्यांनतर, मूळ दस्त शासकीय छायाचित्र नोंदणी कार्यालय,पुणे येथे छायाचित्रणासाठी पाठविले जात होते. त्या कार्यालयात दस्ताचे छायाचित्रण पूर्ण झाल्यांनतर मूळ दस्त व त्याची फोटोप्रींट संबंधित दुय्यम निबंधक कार्यालयाकडे पाठविली जात होती. तदनंतर असा मूळ दस्त दुय्यम निबंधक कार्यालयांकडुन संबंधित पक्षकारांना परत दिला जात होता.

शासकीय छायाचित्र नोंदणी कार्यालय,पुणे कार्यालयात अशा छायाचित्रित केलेल्या दस्तांच्या निगेटीव्ह प्रींटस कायमस्वरुपी जतन केलेल्या आहेत.

तथापि, शासकीय छायाचित्र नोंदणी कार्यालय,पुणे येथे साधारण पणे 1985 नंतरच्या दस्तऐवजांच्या बाबतीत, छायाचित्रण करण्याऐवजी स्कॅनिंग करणेची कार्यवाही सन 2003 ते सन 2007 दरम्यान पूर्ण करण्यात आलेली आहे.